शिव छत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचलित

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## कनिष्ठ महाविद्यालय

(कला, वाणिज्य व एच.एस.सी. व्होकेशनल)

## माहिती पुस्तिका
## २०२१-२०२२

2021



भाग्यश्री वाघचौरे
९५.३३
कला शाखा बोर्ड परीक्षेत
महाविद्यालयात प्रथम



सृष्टी कोकाटे
९५.१७
कला शाखा बोर्ड परीक्षेत
महाविद्यालयात व्दितीय



प्रतिक्षा केदार
९४.६७
कला शाखा बोर्ड परीक्षेत
महाविद्यालयात तृतीय



सिद्धीदात्री तापडीया
९८.६७
वाणिज्य शाखेत बोर्ड परीक्षेत
महाविद्यालयात प्रथम



ऋतुजा पोकरणा
९७.३३
वाणिज्य शाखेत बोर्ड परीक्षेत
महाविद्यालयात व्दितीय



ओम भुतडा
९६.५०
वाणिज्य शाखेत बोर्ड परीक्षेत
महाविद्यालयात तृतीय



Fax : (02382)253645
Phone : (02382) 245933
Visit us at : www.shahucollegelatur.org.in
E-mail : principal@shahucollegelatur.org.in

# शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर

## कार्यकारी मंडळ



**डॉ. गोपाळराव पाटील**
अध्यक्ष



**डॉ. पंढरीनाथ देशमुख**
उपाध्यक्ष



**प्राचार्य अनिरुद्ध जाधव**
सचिव



**श्री. गोपाळ शिंदे**
सहसचिव



**ॲड. सुनिल सोनवणे**
सहसचिव



**ॲड. शहाजी मनाळे**
सदस्य



**प्रा. मधुकर देशमुख**
सदस्य



**डॉ. शिवाजीराव सुर्यवंशी**
सदस्य



**डॉ. रावसाहेब कावळे**
सदस्य



**श्री. भैरवनाथ ठोंबरे**
सदस्य



**श्री. आनंद माने**
सदस्य



**डॉ. शेखर गरड**
सदस्य



**डॉ. सुहास गोरे**
सदस्य



**श्री. महादेव मुळे**
सदस्य



**डॉ. सतिश देशमुख**
सदस्य



**श्री. बब्रुवान गोमसाळे**
निमंत्रीत सदस्य



**डॉ. अजय जाधव**
निमंत्रीत सदस्य



**श्री. प्रकाश देशमुख**
निमंत्रीत सदस्य



**आ. दिलीपराव देशमुख**
सन्माननीय सदस्य



## प्रास्ताविक :

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष या नात्याने राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या परिसरात आपले हार्दिक स्वागत. संस्थेच्या शैक्षणिक संकुलापैकी राजर्षी शाहू महाविद्यालयास अनन्य साधारण महत्व आहे. आपल्या महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रामध्ये दैदिप्यमान यशोशिखर सर केले आहे. अशा उज्वल यशाचे पाईक असणाऱ्या महाविद्यालयाच्या परिसरात प्रवेश इच्छूक विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक बंधू-भगिनींचे पुनश्च हार्दिक स्वागत. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण ही उच्चशिक्षणाची खऱ्या अर्थाने प्रथम पायरी आहे. त्यामुळे येथे शिक्षण घेऊ इच्छिणा-या विद्यार्थी-विद्यार्थीनींचा अनुभव निश्चितच आगळा-वेगळा असेल.

गुणवत्तेचा ध्यास घेतलेल्या या महाविद्यालयात आमच्या विद्यार्थ्यांच्या केवळ ज्ञानकक्षाच रूंदावणार नाहीत, तर त्यांच्या उत्तम भविष्याची पायाभरणी देखील होणार आहे. या महाविद्यालयात शिक्षण घेऊन, आज देश-विदेशात कार्यरत असणारे डॉक्टर्स, इंजिनिअर्स, उद्योजक, प्रशासकीय अधिकारी, सी.ए., राजकीय नेतृत्व, वकिल, प्राध्यापक, व्यापारी व प्रगतीशील शेतकरी हे त्याचेच द्योतक आहे. म्हणूनच राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशासाठी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

डॉ. गोपाळराव पाटील
अध्यक्ष
शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर



## मनोगत...

राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालयात भविष्यातील उत्तुंग यशाची अपेक्षा घेऊन आलेल्या आणि ११ वी कला, वाणिज्य व एच.एस.सी. व्होकेशनल या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेतर्फे हार्दिक स्वागत.

लातूरसारख्या ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या शहरात कांही ध्येयनिष्ठ शिक्षणप्रेमी व्यक्तींनी एकत्र येऊन शिव छत्रपती शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेने प्राथमिक शाळेपासून ते वरिष्ठ महाविद्यालयापर्यंत अनेक शैक्षणिक संकुले निर्माण केली. संस्थेमार्फत आधुनिक काळातील शिक्षण क्षेत्रातील गरजा लक्षात घेऊन अनेक बदल अंगिकारले आहेत त्यापैकीच एक अत्यंत महत्वाचा बदल म्हणजे संस्थेच्या शाहू महाविद्यालयातर्फे राबविला जाणारा 'प्री-प्रोफेशनल एज्युकेशन कोर्स' (Pre Professional Education Course) सुरू करण्यात आला आहे. या कोर्सची तयारी करण्यासाठी सीए फाऊंडेशन सेलची निर्मिती केली आहे. सीए-फाऊंडेशन सेलच्या माध्यमातून वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सीए पूर्वपरीक्षेची तयारी केली जाते.

बदलत्या परिस्थितीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर बारावी बोर्ड परीक्षेसोबतच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशासाठीच्या स्पर्धा परीक्षांचे आव्हान नजरेआड करता येणार नाही. किंबहुना या परीक्षांच्या पूर्व तयारी शिवाय केवळ अकरावी व बारावी बोर्ड अभ्यासक्रमावर स्पर्धा परीक्षांमधील यश हे केवळ दिवास्वप्नच. त्यामुळेच सीए फाऊंडेशनसारख्या प्रवेशपूर्व परीक्षांची विशेष तयारी आमच्या महाविद्यालयातील हे विशेष कक्ष करवून घेतात. याचीच परिणिती म्हणजे महाविद्यालयाने गुणवत्तेमध्ये घेतलेली गगनभरारी व असंख्य विद्यार्थी व पालकांचा आमच्यावरील विश्वास.

आमच्या संस्थेमार्फत चालविले जाणारे सीए-फाऊंडेशनसारखे विशेष कक्ष विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी त्यांच्या पंखामध्ये अलौकिक बळ निर्माण करतील याची मी निसंदिग्ध ग्वाही देतो.

विद्यार्थी मित्रांच्या भविष्यातील वाटचालीस अनेक अनेक शुभेच्छा!

प्राचार्य अनिरूद्ध जाधव
सचिव,
शिव छत्रपती शिक्षण संस्था,लातूर.



## प्राचार्यांचे मनोगत :

प्रिय विद्यार्थीमित्र आणि पालक बंधु-भगिनींनो ....!

प्राचार्य या नात्याने सर्वप्रथम आपले मनःपूर्वक स्वागत.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शाहू महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या आणि घेऊ इच्छिणा-या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा.

सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेवर मात करून कांही ध्येयवादी, निर्मोही वृत्तीच्या उच्चशिक्षितांनी १९६८ मध्ये 'शिव छत्रपती शिक्षण संस्था' स्थापन केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये दडलेली निसर्गदत्त गुणवत्ता जगासमोर आणण्याचे ऐतिहासिक काम या संस्थेने केले. मागील ५१ वर्षापासून संस्थेने यात सातत्य कायम ठेवले आहे. याच संस्थेचा एक घटक असणारे राजर्षी शाहू महाविद्यालय होय. प्रयोगशील आणि नावीन्यता प्रथमपासूनच या महाविद्यालयाने जोपासली आहे.

विद्यार्थी मित्रानों, सर्वच पातळ्यावर सर्वोच्च स्थान असलेले महाराष्ट्रातील हे महाविद्यालय आहे. 'फिनिक्स पक्षी' या बोधचिन्हाच्या संकल्पनेप्रमाणेच महाविद्यालयाने आपल्या ध्येयपूर्तीसाठी अथक परिश्रम घेतले आहेत. विद्यार्थी केंद्रस्थानी मानून त्याच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वोत्तम प्रयत्न करण्याचे काम महाविद्यालय करत आहे. शैक्षणिक मूल्यांची जोपासना आणि Pursuit of Excellence (उत्कृष्टतेचा ध्यास) यास प्रथमपासूनच सर्वोच्च प्राधान्य राहिलेले आहे. शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन आव्हाने यशस्वीरीत्या पेलण्याची क्षमता या महाविद्यालयाने अनेक वेळा सिध्द करून दाखवीलेली आहे. अकरावी ते पदवी आणि पदव्युत्तर वर्गाच्या निकालाने मागील 'चाळीस वर्षांतील निकालाच्या सर्वोत्कृष्ट नोंदी' चमत्कार वाटाव्यात अशाच आहेत. मराठवाड्यातील शैक्षणिकतेचा मोठा अनुशेष भरून काढून लातूर शहरास Educational Hub (शैक्षणिक केंद्रस्थान) बनवणारे महाविद्यालय म्हणून सर्वजण कौतुकाने पाहतात. शैक्षणिक विश्वासार्हता ही या महाविद्यालयाची सर्वात मोठी उपलब्धी आहे. मला आपल्याला सांगायला आनंद वाटतो की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये उत्कृष्ट समाजकार्यासाठी राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारासाठी या महाविद्यालयाची निवड झाली आहे. ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे.

महाविद्यालयाचे सर्व आवश्यक भौतिक सुविधांनीयुक्त असे एकूण चार स्वतंत्र शैक्षणिक संकुल असुन त्यामध्ये कला-वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, जैवतंत्रज्ञान विभाग व क्रीडा संकुल यांचा समावेश आहे.

महाराष्ट्राच्या काना-कोप-यातून येणा-या गरीब व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राहण्यासाठी या शैक्षणिक संकुलांच्या परिसरातच वसतीगृहांची सोय करण्यात आलेली आहे. त्यात सर्व अद्ययावत सोयींनीयुक्त मुलींचे वसतीगृह वरिष्ठ महाविद्यालयात कार्यरत आहे.विद्यार्थ्यांच्या जडण-घडणीसाठी प्राचार्य अनिरुद्ध जाधव कमवा व शिका योजना आणि अनाथ विद्यार्थ्यांच्या उद्धारासाठी प्राचार्य डॉ.रावसाहेब कावळे अनाथ विद्यार्थी दत्तक योजना हे महाविद्यालयाचे वैशिष्ट्ये आहे.

'ग्रंथालय महाविद्यालयाचा आत्मा आहे' या तत्त्वाला अनुसरून ग्रंथसंपदेने सुसज्ज व OPAC सोयींनीयुक्त असे संगणकीकृत ग्रंथालय असून अत्याधुनिक संगणकीय प्रणालीने Online माहिती सेवा घेण्यासाठी N-List व DELNET या Consortia द्वारे असंख्य E-Books व E-Journals ची सुविधा आहे. एकूण ११६५ ग्रंथांची डिजीटल ऑडिओ लायब्ररी ची स्थापना करण्यात आलेली असुन आधुनिक SOUL व Green Stone सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्याबरोबरच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र 'प्लेसमेंट सेल' ची निर्मिती करण्यात आलेली असून प्लेसमेंट सेल द्वारे नामांकित अशा राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यामार्फत कॅम्पस मुलाखती घेतल्या जात आहेत.

आमच्या महाविद्यालयाचा क्रीडा, सांस्कृतिक, वाद-विवाद, वक्तृत्त्व स्पर्धा व अन्य क्षेत्रातील विद्यापीठ पातळीवरील दबदबा कायम राहीला आहे. सामाजिक क्षेत्रात राष्ट्रीय सेवा योजना, विवेक वाहिनी व अंधश्रध्दा निर्मूलनाच्या माध्यमातून सामाजिक कार्यात आम्ही आघाडीवर

आहोत. सर्व वर्गांच्या अभ्यासक्रमांत मूल्यशिक्षणावर भर देण्याबरोबरच मूल्यशिक्षण आणि भारतीय राज्यघटनेच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मूल्याबरोबरच मुलभूत कर्तव्य व अधिकाराची जाणीव निर्माण होते.

विद्यार्थी मित्रांनो, शैक्षणिक वातावरण निकोप ठेवण्यासाठी शिस्तीला या महाविद्यालयात सर्वोत्तम स्थान देण्यात आले आहे. महाविद्यालयात गणवेश आणि ओळखपत्र आवश्यकच आहे. वर्तमान काळात ज्ञान संपादनाची साधने वाढली; पण अभ्यास मात्र कमी होत चालला आहे. याकडे जाणीवर्पूक लक्ष द्यावे. यशाचा 'पासवर्ड' सांगणारे खूप भेटतील; पण कठोर मेहनत आणि सातत्य याला 'शॉर्टकट' नाही हे कायम लक्षात ठेवावे. अभ्यास हा आत्मविकासासाठी करावयाचा असतो. वाचन, लेखन आणि चिंतन ही तुमची अभिरूची झाली पाहिजे. तांत्रिक लेखनपद्धती आणि यांत्रिक मुद्रणकलेमुळे हस्ताक्षराला अधोगती आली आहे याकडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. सुंदर हस्ताक्षर हा एक दागिणा आहे. संत रामदास म्हणतात, त्याप्रमाणे 'दिसामाजी काहीतरी लिहित जावे' हा क्रम विसरू नये. येणारा प्रत्येक दिवस जीवनाची एक लहान आवृत्ती असते, असे समजा... जो दिवस गमावतो तो आयुष्यही गमावतो.

COVID-19 च्या पार्श्वभूमिवर...

आतापर्यंत इतिहासामध्ये मानवजातीवर आलेल्या अनेक संकटांवर मानवाने आपल्या हुशारीने, प्रयत्नांनी व निसर्गाच्या साथीने मात केली आहे. असं म्हणतात, आपल्यावर येणारे संकटच त्यावर मात करण्याच्या शक्तीला जन्माला घालण्याचं बळ आपल्याला देत असतं. विद्यार्थी मित्रांनो, कोविड-१९ च्या या गंभीर संकटातून बाहेर पडण्याची शक्ती आपल्याला सामूहिक प्रयत्नांनी निर्माण करावी लागणार आहे. जगभरातील सर्व मानवजातीचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व्यवहार कोविड-१९ या विषाणुच्या प्रादुर्भावाने बाधित झाले आहेत. परंतु 'शिक्षण' ही सातत्यपूर्ण व गतिमान प्रक्रिया आहे. अखंड चालणारी प्रक्रिया आहे. आव्हानात्मक परिस्थितीमध्ये तर शिक्षणाच्या, शिकण्या-शिकवण्याच्या प्रक्रियेला अजून धार आली पाहिजे. संकटावर मात करण्याचे मनोबल ज्या शिक्षणाने मिळते, ती शिक्षण प्रक्रिया अन्य सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक उपक्रमांपेक्षा अधिक प्राधान्याने राबविली पाहिजे. आणि म्हणूनच, राजर्षी शाहू महाविद्यालय या गंभीर परिस्थितीत कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्यविषयक शारीरीक अंतराचे (Physical Distancing) सर्व नियम पाळून व सर्व शासकीय निर्णयांचे पालन करीत ही शिक्षणप्रक्रिया कशी सुरु ठेवता येईल यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. हे महाविद्यालय व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व प्रत्येक कर्मचारी स्वतःला तंत्रज्ञानाच्या आधारे काम करण्यासाठी सक्षम बनवत आहेत.

सूज्ञ पालक व विद्यार्थी मित्रांनो, एच.एस.सी. बोर्ड परीक्षा २०२१ चे निकाल नुकतेच लागलेले आहेत. महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य, विज्ञान व एच.एस.सी. व्होकेशनल शाखेच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन करत महाविद्यालयाच्या यशाचा आलेख आणखी उंचावला आहे. कोविड-१९ विषाणुच्या संकटाने हतबल न होता, शांत बसून न राहता महाविद्यालयाने इयत्ता बारावीच्या सर्व शाखेतील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन वर्ग (Online Class) सुरु केले आहेत. विद्यार्थ्यांसाठी व्हीडीओ रेकॉर्डीगच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याची निर्मिती केली आहे. या आव्हानात्मक परिस्थितीत तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि वापर महाविद्यालयाने केला आहे. Digital Mode मध्ये महाविद्यालय व सर्व मनुष्यबळाने पूर्ण क्षमतेने कार्य करण्याचा दृढ संकल्प केला आहे. पालक म्हणून आपल्यालाही हे बदल स्वीकारावे लागणार आहेत. इयत्ता अकरावी व वरिष्ठ महाविद्यालयातील विविध शाखांच्या प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन स्वरुपात आपण पार पाडणार आहोत. त्यासाठी महाविद्यालयाच्या वेबसाईटवर विविध लिंक सुरु करण्यात आलेल्या आहेत, त्यांचे अवलोकन करावे.

शिक्षणप्रक्रिया सुरु ठेवण्याचा आमचा संकल्प तुमच्या व तुमच्या पाल्यांच्या सहकार्यानेच पूर्ण होऊ शकणार आहे. त्यासाठी ऑनलाईन प्रक्रियांचा अवलंब करुन पुढे जावे लागणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे सर्व करत असताना कोविड १९ विषाणुचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी आपणास घ्यावी लागणार आहे. कोविड १९ च्या या वैश्विक महामारीवर मात करण्याचे बळ आपल्या सामूहिक प्रयत्नांना मिळावे अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. तसेच भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या व नवीन शैक्षणिक वर्षाच्या सर्व विद्यार्थी व पालकांना शुभेच्छा देतो. या शैक्षणिक वर्षासाठी पुनःश्च एकदा आपणास शुभेच्छा!

**डॉ. महादेव गव्हाणे**
**प्राचार्य**

# ◉ कनिष्ठ महाविद्यालय ◉
## (कला, वाणिज्य व एच.एस.सी. व्होकेशनल शाखा)

## ११ वी कला

**प्रवेश क्षमता : ३००** **माध्यम : मराठी**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १. | **अनिवार्य विषय** | |
| | इंग्रजी | १०० |
| | पर्यावरण शिक्षण | ग्रेड |
| | आरोग्य व शारीरिक शिक्षण | ग्रेड |
| २. | **द्वितीय भाषा**<br>मराठी, हिंदी, पाली,<br>संस्कृत, रशियन<br>(यापैकी कोणतीही एक भाषा निवडावी) | १०० |
| ३. | **ऐच्छिक विषय**<br>इतिहास, भूगोल,<br>अर्थशास्त्र, राज्यशास्त्र,<br>समाजशास्त्र, संगीत<br>(यापैकी कोणतेही चार विषय निवडावेत) | ४०० |
| | **एकूण गुण** | ६०० |

**प्रवेश क्षमता : ६०** **माध्यम : इंग्रजी**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १. | **अनिवार्य विषय** | |
| | इंग्रजी | १०० |
| | पर्यावरण शिक्षण | ग्रेड |
| | आरोग्य व शारीरिक शिक्षण | ग्रेड |
| २. | **द्वितीय भाषा**<br>मराठी, हिंदी, पाली,<br>संस्कृत, रशियन<br>(यापैकी कोणतीही एक भाषा निवडावी) | १०० |
| ३. | भूगोल, अर्थशास्त्र,<br>राज्यशास्त्र, आय.टी. | ४०० |
| | **एकूण गुण** | ६०० |

## ११ वी वाणिज्य

**प्रवेश क्षमता अनुदानित : ३६०** **माध्यम : इंग्रजी**

**प्रवेश क्षमता स्वयंअर्थसहाय्यित : ३६० माध्यम : इंग्रजी**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १. | **अनिवार्य विषय** | |
| | इंग्रजी | १०० |
| | पर्यावरण शिक्षण | ग्रेड |
| | आरोग्य व शारीरिक शिक्षण | ग्रेड |
| २. | **द्वितीय भाषा**<br>मराठी, हिंदी, पाली,<br>संस्कृत, रशियन<br>(यापैकी कोणतीही एक भाषा निवडावी) | १०० |
| ३. | Book Keeping &<br>Accountancy, O.CM.,<br>Economics, Maths OR S.P. | ४०० |
| | **एकूण गुण** | ६०० |

### CA-Foundation तयारी वर्ग

११ वी वाणिज्य वर्गापासूनच CA-Foundation (सीए प्रवेश परीक्षा) तयारी वर्ग संस्थेतर्फे चालविले जातात. त्यासाठी वेगळी फीस आकारली जाईल. (प्रवेश क्षमता १००)

**टीप :**
१) ११वी कला व वाणिज्य वर्गातील अंतिम प्रवेशानंतर गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांचे विषय निश्चित केले जातात. म्हणून प्रवेश अर्जावर मागणी केलेले विषय अंतिम असत नाहीत.
२) ११ वी कला शाखेत इंग्रजी माध्यमाची एक स्वतंत्र तुकडी राहील.
३) इ. ११वी कला/वाणिज्य मध्ये निवडलेलेच विषय १२वी कला व वाणिज्य शाखेत अभ्यासावे लागतील.

## ११ वी व्यावसायिक अभ्यासक्रम
## (HSC-VOCATIONAL)

**उच्च माध्यमिक व्यावसायिक (HSC-VOCATIONAL) अभ्यासक्रम**
**संकेतस्थळ** :
www.mahahsscboard.maharashtra.gov.in
**अनिवार्य विषय** :
१) इंग्रजी
२) जनरल फाऊंडेशन कोर्स
३) पर्यावरण शिक्षण
४) आरोग्य व शारीरिक शिक्षण

**द्वितीय भाषा** : मराठी / हिंदी
**ऐच्छिक विषय** :
१) पीक आणि बीजोत्पादन तंत्रज्ञान (LA, LB, LC)
२) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी (EA, EB, EC),
३) मत्स्य तंत्रज्ञान (NA, NB, NC)

**विद्यार्थ्याने वरील तीन गटापैकी कोणत्याही एका गटाची निवड करावी.**

**टीप :**
१) पीक आणि बीजोत्पादन तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी व मत्स्य तंत्रज्ञान या तीन विषयाची प्रवेश क्षमता प्रत्येकी २५ विद्यार्थी आहे. अंतिम प्रवेशासाठी स्वतंत्र अर्ज कार्यालयातून घ्यावा लागेल.
२) व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करणाया विद्यार्थ्यांना १२वी नंतर बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस.डब्ल्यु, एल.एल.बी., बी.सी.ए., डी.टी.एड. (पीकशास्त्र), पॉलिटेक्निक (इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो.

**व्यावसायिक अभ्यासक्रमास थेट प्रवेश दिला जातो.**

## प्रवेश पद्धत

**११वी कला व वाणिज्य शाखेच्या प्रवेशासाठी यावर्षीपासून ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. महाविद्यालयाच्या** www.shahucollegelatur.org.in **या वेबसाईटवर आपण प्रवेश नोंदणी करु शकता.**

**अ) नोंदणी (रजिस्ट्रेशन) करणे :** १० वी बोर्ड परीक्षेचा निकाल (Online) जाहीर झाल्यानंतर लगेच दुसया दिवशीपासून नोंदणी अर्ज Online स्विकारले जातील.

**ऑनलाईन नोंदणी अर्जासोबत अपलोड करावयाची कागदपत्रे :** (PDF)
१) ऑनलाईन गुणपत्रक अथवा मूळ गुणपत्रकाची प्रत
२) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जातीचे प्रमाणपत्र.
३) अपंग प्रमाणपत्र
४) आजी-माजी सैनिक प्रमाणपत्र
५) कला व क्रीडा संबंधी प्रमाणपत्र
६) आधारकार्ड सत्यप्रत
७) Online नोंदणी करताना वरील कागदपत्रे Scan करुन अपलोड करावेत.

**ब) अंतिम प्रवेश :**
१) **मुळ गुणपत्रक, मुळ टी.सी., राखीव / आरक्षित जागेसाठी संबंधित विभागातील सक्षम अधिकायाने दिलेले प्रमाणपत्र कार्यालयात जमा केल्यानंतरच अंतिम प्रवेश निश्चित होईल.**
२) महाराष्ट्राबाहेरील विद्यालयातून १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यां नी स्थलांतर प्रमाणपत्र ा(मायग्रेशन सर्टिफिकेट) ची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.
३) नुकताच काढलेला पासपोर्ट साईजमधील फोटो ज्यावर विद्यार्थ्यांचे नांव व फोटो काढल्याची दिनांक नोंदवलेली असेल अशा फोटोची एक प्रत.

**प्रवेश फीस -**
प्रवेश अर्जासोबत शाखानिहाय, तुकडीनिहाय वेगवेगळी फीस आहे. योग्य फीस भरून प्रवेश अंतिम करावा. (फीसंबंधी माहिती पान क्र. १० ते १३ वर दिली आहे.)

## महत्त्वाच्या सूचना

- सर्व शाखांचे प्रवेश १० वी परीक्षेतील गुणानुसार दिले जातात.
- **इंग्रजी माध्यम , सीबीएसई ,आयसीएसई वा इतर बोर्ड यांच्यासाठी राखीव जागा नाहीत. सर्वच बोर्डाच्या विद्या र्थ्यांची गुणाच्या टक्केवारीवर आधारित एकच प्रवेश यादी असते.**
- सर्व तुकडीतील प्रवेशासाठी आरक्षणाचे नियम शासनाच्या प्रचलित नियमानुसार लागू राहतील.
- डुप्लीकेट टी.सी.च्या आधारावर महाविद्यालयात प्रवेश दिला जात नाही.
- **अंतिम प्रवेशाच्या वेळी कार्यालयात दिलेली मूळ प्रमाणपत्रे कोणत्याही कारणास्तव परत दिली जात नाहीत म्हणून विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या जादा सत्यप्रती इतर कामासाठी स्वतःजवळ ठेवाव्यात.**
- टी.सी. व इतर कागदपत्रावर खाडाखोड करणे दखलपात्र गुन्हा आहे. खाडाखोड केलेले दृष्टीपथास आल्यास प्रवेश रद्द होतो.
- मूळ प्रमाणपत्रे कार्यालयात दाखल केल्याची पावती घ्यावी लागते.
- पावती नसेल तर मूळ प्रमाणपत्रे गहाळ झाल्याच्या तक्रारीची दखल महाविद्यालय घेणार नाही.
- फी भरलेल्या सर्व पावत्या जपून ठेवाव्यात. पावती हरवल्यास दुसरी पावती देण्यात येणार नाही.

## प्री-प्रोफेशनल एज्युकेशन (PPE) कोर्स

१) **वाणिज्य शाखा :**

पीपीई सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत १२ वी वाणिज्य नंतर सीए होऊ इच्छिणाया विद्यार्थ्यांसाठी संस्थेतर्फे **सीए फाऊंडेशन** कोर्स सुरू करण्यात आला आहे. ११ वी व १२ वी वाणिज्य अभ्यासक्रमाबरोबरच **सीए- फाऊंडेशनचा** अभ्यास करून घेण्यासाठी वेगळे वर्ग घेतले जातात. यासाठी संस्थेने स्वतंत्र **'सीए- फाऊंडेशन-सेल'** स्थापन केलेला आहे. या कोर्सला प्रवेश घेऊ इच्छिणाया विद्यार्थ्यांना वेगळा अर्ज करावा लागेल आणि या कोर्ससाठी प्रत्येक वर्षासाठी अतिरिक्त फीस आकारली जाईल. या वर्गासाठी फक्त १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ११वी **सीए फाऊंडेशन**ला प्रवेश घेतल्यानंतर तो रद्द करता येत नाही. या कोर्सला उज्वल निकालाची परंपरा आहे.

२) **कला शाखा :**

इंग्रजी भाषेचे वाढते महत्व लक्षात घेता संस्थेने कनिष्ठ महाविद्यालयात **कला शाखेत इंग्रजी माध्यमाची एक स्वतंत्र तुकडी** सुरू केली आहे. इंग्रजी माध्यमातून कला शाखेचे शिक्षण घेऊ इच्छिणाया विद्यार्थ्यांनी हा पर्याय आवश्य निवडावा. एसएससी परीक्षेत मराठी/सेमी इंग्रजी माध्यम ७० टक्के पेक्षा जास्त आणि इंग्रजी माध्यम ६० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळविणाया विद्यार्थ्यांना या तुकडीत प्रवेश दिला जाईल. या तुकडीत प्रवेश घेऊ इच्छिणाया विद्यार्थ्यांना वेगळी फीस आकारली जाईल. इंग्रजी माध्यमाची स्वतंत्र तुकडी असणारे मराठवाड्यातील हे एकमेव महाविद्यालय आहे.

## CA-Foundation Batch

**वैशिष्ट्येः**

(१) अकरावी पासूनच स्वतंत्र तयारी वर्ग.

(२) मर्यादीत प्रवेश क्षमता (१०० जागा).

(३) सीए-फाऊंडेशनच्या सर्व विषयांची तयारी.

(४) सकाळी ८ ते सायं. ५ वाजेपर्यंत तासिका.

(५) साप्ताहिक सराव परीक्षा.

(६) स्वतंत्र विभाग व सुसज्ज वर्गखोल्या.

(७) ICT आधारित अध्ययन अध्यापन.

(८) स्वतंत्र ग्रंथालयाची व्यवस्था.

(९) अनुभवी व तज्ञ प्राध्यापकवृंद.

(१०)एसएससी परीक्षेत ९० टक्के (मराठी माध्यम) आणि सी.बी.एस.ई व आय.सी.एस.ई बोर्ड परीक्षेत ८५टक्के पेक्षा जास्त गुण असणाया विद्यार्थ्यांना थेट प्रवेश.

(११) उन्हाळी तसेच दिपावली सुट्टीतही वर्ग.

(१२) विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष.

(१३) CA-Foundation अभ्यासक्रमाचा पूर्ण पुस्तकसंच कोर्स कालावधीपर्यंत दिला जाईल.

## CA - Foundation Nov. 2020

- सीए-फाऊंडेशन नोव्हेंबर २०२० परीक्षेत महाविद्यालयातून एकूण ३४ विद्यार्थी उत्तीर्ण.
- भारतामध्ये गतवर्षी घेण्यात आलेल्या सीए-फाऊंडेशन परीक्षेमध्ये आपल्या महाविद्यालयाची कु. वेदपाठक श्रुती राजेश ही विद्यार्थीनी ३२३ गुण घेवून महाविद्यालयातून सीए-फाऊंडेशन परीक्षेत प्रथम आली.

  हे आपल्या महाविद्यालयाचे एक अतुलनीय यश गतवर्षीच्या परीक्षेमध्ये सीए-फाऊंडेशन सेलने मिळविले आहे.
- सी.ए.-फाऊंडेशन १२वी वाणिज्य तुकडीतील एकुण ८६ विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थ्यांना बारावी बोर्ड परीक्षेत ८५.००% पेक्षा जास्त गुण.

## १२वी बोर्ड परीक्षा निकालाची ठळक वैशिष्ट्ये

विषयनिहाय पैकीच्या पैकी गुण घेणाया विद्यार्थ्यांची संख्या

| | | |
|---|---|---|
| १) | पाली | - १२ (वाणिज्य) |
| २) | गणित | - ०९ (वाणिज्य) |
| ३) | पुस्तपालन व लेखाकर्म | - ०३ (वाणिज्य) |
| ४) | अर्थशास्त्र | - ०१ (वाणिज्य) |
| ५) | पाली | - ०१ (कला) |

### १२ वी बोर्ड परीक्षा - २०२१ शाखानिहाय निकाल

| शाखा | परीक्षेस बसलेले एकूण विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शेकडा निकाल | लातूर विभागाचे उत्तीर्णाचे प्रमाण | फरक | ९० % पेक्षा जास्त विद्यार्थी | ८५ % पेक्षा जास्त विद्यार्थी | ८० % पेक्षा जास्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला | ३२३ | ३१७ | ९८.१४% | ९९.८५ | - १.७१ | १७ | ३१ | ५२ |
| वाणिज्य | ५७९ | ५७९ | १००% | ९९.९८ | + ०.०२ | ५७ | १३८ | २५७ |

| शाखा | परीक्षेस बसलेले एकूण विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शेकडा निकाल | लातूर विभागाचे उत्तीर्णाचे प्रमाण | फरक | ८० % पेक्षा जास्त विद्यार्थी | विशेष प्राविण्य विद्यार्थी | प्रथम श्रेणी विद्यार्थी | द्वितीय श्रेणी विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एमसीव्हीसी | ५१ | ५० | ९०.०३% | ८६.०७% | +११.९६ | ०३ | ०६ | २८ | १३ |

## महाविद्यालयाचे नियम व अटी

**प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील खालील सूचना व नियमांचे पालन करावे लागेल :**

### उपस्थिती

१) प्रत्येक तासाला विद्यार्थ्यांची उपस्थिती घेतली जाते.

२) प्रत्येक विषयाची दरमहा किमान **७५%** उपस्थिती **बंधनकारक** आहे.

३) प्रत्येक महिन्यातील उपस्थिती ७५%पेक्षा कमी असल्यासः

अ) दंड आकारला जातो.

ब) पालकांना SMS द्वारे कळविले जाते.

क) सततच्या गैरहजेरीबद्दल विद्यार्थ्यांस ताकीद दिली जाते व महाविद्यालयामार्फत दिल्या जाणाया सवलती रद्द केल्या जातात.

ड) सातत्याने गैरहजर राहणाया विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द केला जातो.

४) सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा, वक्तृत्व व वादविवाद, एन.सी.सी., एन.एस.एस., शैक्षणिक सहली अथवा अन्य संयुक्तिक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी प्रभारी प्राध्यापकांच्या स्वाक्षरीसह त्या त्या वेळीच परवानगी अर्ज कार्यालयात दाखल करणे बंधनकारक आहे.

५) **विद्यार्थी आजारी असल्यास, आजारानंतर महाविद्यालयात पालकासोबत येतांना वैद्यकीय प्रमाणपत्र आणून कार्यालयात दाखल करणे बंधनकारक राहील. तसेच जास्त दिवस आजारी असल्यास पालकाद्वारे महाविद्यालयास पूर्व सूचना देणे आवश्यक आहे.**

६) आजारी पडल्यामुळे रजा मंजूर केली तरी बोर्डाच्या नियमानुसार किमान ७५% उपस्थिती दोन्ही वर्षात आवश्यक आहे (म्हणजेच आजारी रजेसाठी जास्तीत जास्त १०% सवलत देता येते).

### ऑनलाईन वर्गाचे नियम

१) सर्व ऑनलाईन तासिकांना उपस्थिती बंधनकारक असेल.

२) ऑनलाईन तास रेकॉर्डिंग करुन त्याचा गैरवापर करता येणार नाही.

३) ग्रुपमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

४) विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करावे.

### परीक्षा

१) महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाया सत्र / सराव / पूर्व वार्षिक इ. परीक्षा देणे विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य आहे.

२) परीक्षेत विना परवानगी अनुपस्थित रहाणाया विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो.

३) **परीक्षेत सर्वाधिक गुण घेणाया विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात आणि त्यांची नावे श्रेयफलकावर लिहिली जातात.**

### मोबाईल गैरवापरास बंदी

**महाविद्यालयाच्या परिसरात विशेषतः वर्गामध्ये मोबाईलचा गैरवापर केल्याचे आढळून आल्यास मोबाईल जप्त केला जातो व पालकांशिवाय इतर कोणाकडेही परत केला जाणार नाही. दंड आकारला जाईल.**

### लैंगिक छळ प्रतिबंधक समिती

महाविद्यालयात महिला छेडछाड-लैंगिक छळ प्रतिबंधक समिती कार्यरत आहे.

### रॅगिंग

**रॅगिंग प्रकरणी दोषी विद्यार्थ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. दोषी आढळल्यास रु. २५,०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल. तसेच वर्ग बंद करणे, परीक्षेपासून वंचित ठेवणे, शिष्यवृत्ती बंद करणे इत्यादी शिक्षेबरोबरच फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल होऊ शकतो. या संबंधी स्वतंत्र रॅगिंग प्रतिबंधक समिती कार्यरत आहे.**

### शिस्त

१) सर्व विद्यार्थ्यांनी परिसरात व वर्गात शांतता पाळणे आवश्यक आहे.

२) दररोज गणवेशात येणे बंधनकारक आहे.

३) महाविद्यालयाने दिलेले ओळखपत्र गळ्यात घालणे बंधनकारक आहे.

### खालील कृत्यांचा शिस्तभंगात समावेश होतो

१) गणवेश आणि ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात येणे.

२) वर्गात अथवा महाविद्यालयात गटबाजी करणे, भांडण करणे, गोंधळ घालणे, हुल्लडबाजी करणे इ.

३) परस्पर विना परवानगी सामुहिक सुट्टी घेणे.

४) विद्यार्थिनींची छेडछाड करणे.

५) प्राध्यापकांचा आज्ञाभंग करणे आणि प्राध्यापक व कर्मचायांशी उद्धट वर्तन करणे.

६) महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेस्कवर, फलकावर असभ्य मजकूर लिहिणे व चित्रे काढणे.

७) वर्ग चालू असतांना व्हरांड्यात रेंगाळणे किंवा वर्गासमोर उभे राहून विक्षिप्त हालचाली करणे इ.

८) महाविद्यालयाच्या परवानगीशिवाय सहलीस जाणे, परस्पर सहलीचे आयोजन करणे व महाविद्यालयाच्या परिसराबाहेर स्नेह संमेलनासारखे कार्यक्रम आयोजित करणे इ. बेशिस्त वर्तन समजले जाईल.

९) वर्गातील / प्रयोगशाळेतील /परिसरातील सामानांची मोडतोड करणे, चोरी करणे, ग्रंथालयातील पुस्तके फाडणे इ.

१०) वर्गामध्ये वाढदिवस साजरा करणे.

११) **महाविद्यालयाच्या परिसरात तंबाखू, पान खाण्यास व बिडी, सिगारेट ओढण्यास सक्त बंदी घालण्यात आलेली असून, वरीलपैकी कोणतेही व्यसन करणायास रु. ५०० दंड आकारुन कडक कारवाई केली जाईल.**

१२) महाविद्यालयातील नळ, तोट्या चालु ठेवणे.

१३) गट करून प्रांगणात एकत्र बसणे किंवा थांबणे.

### स्वच्छतेसंबंधी

१) महाविद्यालयाचा परिसर नेहमी स्वच्छ राहणे अपेक्षित आहे.

२) प्रत्येक विद्यार्थ्याने आपापल्या परीने परीसर स्वच्छ ठेवण्याचे प्रयत्न करावेत.

३) वापरलेले कागद, चिठ्ठया, प्लॅस्टिक, खाद्यपदार्थांचे कव्हर/ रॅपर इ. प्रांगणात टाकू नये. या सर्व टाकाऊ वस्तु जवळच्या कचराकुंडीतच टाकाव्यात.

४) महाविद्यालय परिसरात भिंतीवर तसेच कानाकोपयात पान, तंबाखू, गुटखा इ. खाऊन थुंकू नये. तसे आढळून आल्यास रू.५००/- दंड आकारला जाईल.

## महाविद्यालयात राबविले जाणारे उपक्रम

### राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, श्रमप्रतिष्ठा व कलागुणांच्या विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विविध उपक्रम राबविले जातात.

### उपक्रम

जलसंवर्धन, वृक्षारोपन, व्यसनमुक्ती, रक्तदान, झोपडपट्टी सर्वेक्षण, अंध - अपंग मैत्री, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत, वर्तमान ज्वलंत प्रश्नावर चर्चासत्र, कलापथक, पथनाट्य, अंधश्रद्धा निर्मुलन.

१) सहभागी विद्यार्थ्यांची संख्या - १००

२) युवक शिबीर - ५० विद्यार्थ्यांसाठी, दिवाळीच्या सुट्टीत ग्रामीण भागात ०७ दिवसांचे शिबीर आयोजित केले जाते.

३) दोन वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात येते.

### क्रीडा विभाग

विद्यार्थी - विद्यार्थिनींच्या अंगी खिलाडूवृत्तीचा विकास व्हावा, देशी - विदेशी खेळांची आवड निर्माण व्हावी, आरोग्य संवर्धन व्हावे यासाठी महाविद्यालयाने क्रीडा मंडळ कार्यरत आहे. बैठे खेळ, इनडोअर मॅचेस, मैदानी खेळ यात महाविद्यालयाच्या क्रीडा संघांनी जिल्हा, विभागीय आणि राज्य पातळीवर नेत्रदीपक यश मिळविले आहे. काही क्रीडा स्पर्धांमध्ये राष्ट्रीय पातळीवरही प्रतिनिधीत्व करून विविध बहूमान प्राप्त केला आहे.

### महाविद्यालयीन वार्षिकांक

महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये सृजनक्षमता असते. त्यांच्या सृजनशिलतेला चालना देण्यासाठी, रसग्रहण, आकलन, समीक्षणदृष्टी यावी यासाठी महाविद्यालयामार्फत **'शब्दगंध'** नावाचा वार्षिकांक काढण्यात येतो. यामध्ये कथा, कविता, वैचारिक लेख, समीक्षा इत्यादी लेखनाला प्राधान्य देण्यात येते.

### शैक्षणिक समन्वय समिती

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न, अडीअडचणी सोडविण्यासाठी महाविद्यालयात शैक्षणिक समन्वय समिती कार्यरत आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी संबंधित शाखेतील समिती सदस्यांशी संपर्क साधावा.

### प्राचार्य अनिरुद्ध जाधव कमवा व शिका योजना

शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ असलेल्या कर्मवीर भाऊराव पाटलांनी मोठ्या ध्येयवादाने ग्रामीण भागातून शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी '**कमवा व शिका**' योजनेचा मोठ्या आग्रहाने पुरस्कार केला होता. हाच आदर्श डोळ्यापुढे ठेवून या महाविद्यालयामध्ये '**प्राचार्य अनिरुद्ध जाधव कमवा व शिका योजना**' राबविण्यात येते. कष्टाळू, होतकरू, प्रामाणिक, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना स्वावलंबी वृत्तीने आपले स्वतःचे शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी त्यांची आवड व इच्छेनुसार त्यांना विविध प्रकारची कामे उपलब्ध करून दिली जातात.

### कर्मयोगी ॲड. नारायणराव पाटील विद्यार्थी सहाय्य निधी

२००७-२००८ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयाच्या कला शाखेत प्रवेश घेतलेल्या ग्रामीण, गरीब, होतकरू व आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांना आपले स्वतःचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करता यावे यासाठी **कर्मयोगी ॲड. नारायणराव पाटील** विद्यार्थी सहाय्य निधीतून विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत.

या योजने अंतर्गत ११वी व १२वी कला शाखेत प्रवेश घेतलेल्या प्रत्येक वर्गातील एका विद्यार्थ्यास '**तुकाराम पाटील धानोरकर शिष्यवृत्ती**' तसेच याच शाखेतील प्रत्येकी एका विद्यार्थिनीस '**गीताबाई तुकाराम पाटील धानोरकर शिष्यवृत्ती**' दिली जाते.

### प्राचार्य डॉ. आर.एल. कावळे अनाथ विद्यार्थी दत्तक योजना

२००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून निराधार, कष्टाळू, होतकरू व प्रामाणिक अशा अनाथ विद्यार्थ्यांना स्वावलंबी वृत्तीने आपले स्वःतचे शिक्षण पूर्ण करता यावे व आपले जीवन यशस्वीरित्या जगता यावे या उदात्त हेतूने **प्राचार्य डॉ.आर.एल.कावळे अनाथ विद्यार्थी दत्तक योजना** सुरू करण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत दरवर्षी दोन विद्यार्थ्यांची त्यांच्या सामाजिक / कौटुंबिक व आर्थिक पार्श्वभूमीच्या व शैक्षणिक योग्यतेच्या आधारे निवड केली जाणार असून त्यांचा महाविद्यालयातील संपूर्ण शैक्षणिक खर्च या योजनेतून केला जाणार आहे.

### वसतिगृह

**वसतिगृह - [A] (शाहू महाविद्यालयाच्या जुन्या इमारतीतील मुलींचे वसतिगृह)**

प्रवेश क्षमता- साधारणपणे १२० मुली

कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीना गुणवत्तेवर प्रवेश दिला जातो.

## ग्रंथालय विभाग

### ग्रंथालयाचे सर्वसाधारण नियम

१) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथालय सभासदत्व फॉर्म भरणे अनिवार्य आहे.

२) ग्रंथालय सभासदत्व फॉर्मवरील भरलेली माहिती खोटी आढळून आल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

३) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क रु. ५०/- भरुन संगणकीय ओळखपत्र घ्यावे लागेल.

४) महाविद्यालयात येताना विद्यार्थ्यांसोबत ओळखपत्र असणे बंधनकारक आहे. महाविद्यालयीन कर्मचायांनी मागणी करताच ओळखपत्र सादर करावे लागेल.

५) विद्यार्थ्यांने ग्रंथालय व वाचनकक्षात गणवेशात असणे आवश्यक आहे. रात्रीच्या अभ्यासिकेत मात्र गणवेशात येणे अनिवार्य नाही.

६) डुप्लिकेट ओळखपत्रासाठी रु. १००/- शुल्क आकारण्यात येईल.

७) ग्रंथालयातून ग्रंथ घेत असताना त्याची पाने तपासून घ्यावीत.

८) ग्रंथाची पाने फाडल्यावर झेरॉक्स चार्ज प्रती पेज रु.१/- व ग्रंथ बांधणी शुल्क रु.३०/- आकारण्यात येईल.

९) ग्रंथ हरवल्यास किंवा अत्यंत खराब केल्यास, ग्रंथाची पाने फाडल्यास नविन ग्रंथ उपलब्ध करुन द्यावा लागेल, अन्यथा ग्रंथाच्या अद्ययावत किंमतीच्या दुप्पट रक्कम वसूल केली जाईल, परंतु ग्रंथाची दुप्पट किंमत रु. १००/- पेक्षा कमी होत असेल तर कमीत कमी रु. १००/- किंमत आकारण्यात येईल.

१०) अभ्यासिकेतून ओळखपत्रावर घेतलेली पुस्तके किंवा इतर वाचनसाहित्य घरी जाताना परत करावीत, अन्यथा दररोज रु. १०/- या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

११) दिवाळीच्या सुट्टीत नेहमीप्रमाणे देवघेव विभाग चालू राहील. दिवाळी अथवा उन्हाळी संपूर्ण सुट्टीसाठी ग्रंथालयाच्या देवघेव विभागातून पुस्तके मिळणार नाहीत. सुट्टीमधील लागलेला विलंब शुल्क कोणत्याही सबबीवर माफ केला जाणार नाही.

१२) ग्रंथालयातील कर्मचायांशी असभ्य वर्तन करणे व शिस्त न पाळणाया विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय सवलती बंद केल्या जातील.तसेच अशा विद्यार्थ्यांस दंड आकारला जाईल अथवा प्रवेश रद्द केला जाईल.

१३) शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासुनच वाचनकक्ष व रात्रीची अभ्यासिका सकाळी ८.३० ते रात्री १०.०० या वेळेपर्यंत चालू राहील.

१४) ग्रंथालयात प्रवेश केल्याबरोबर आप-आपले मोबाईल्स् बंद ठेवावेत. अन्यथा नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१५) ग्रंथालयासंदर्भात विद्यार्थ्यांच्या कांही तक्रारी असल्यास त्या लेखी स्वरुपात वाचनकक्षातील देवघेव विभागासमोरील सूचना पेटीत टाकाव्यात किंवा ग्रंथपालाशी संपर्क साधावा.

१६) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा : महाविद्यालयातील वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि अभ्यासक्रमाव्यतिरीक्त इतर वेगवेगळ्या आशयाची पुस्तके वाचून प्रगल्भता वाढावी म्हणून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा निर्माण करण्यात आला आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी कपाटातील ग्रंथ, नियतकालिके व वृत्तपत्रे स्वतः कपाटातून घेऊन ग्रंथ वाचण्याची सोय केली आहे.

## देवघेव विभाग

१) देवघेव विभाग सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत चालू राहील.

२) विद्यार्थ्यांना संगणकीय ओळखपत्रावर एक ग्रंथ सात दिवसाकरिता दिला जाईल.

३) वाचनस्पर्धा व लेखन स्पर्धेसाठी संबंधीत विभागामार्फत शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना ओळखपत्रावरील पुस्तकाशिवाय ग्रंथालयातून अतिरिक्त एक ग्रंथ दिला जाईल.

४) संदर्भ ग्रंथ व दुर्मिळ ग्रंथ घरी दिले जाणार नाहीत, मात्र ते वाचनकक्षात ओळखपत्रावर घेवून वाचता येतील.

५) देवघेव विभागातून ओळखपत्रावर देण्यात आलेली पुस्तके दिलेल्या मुदतीच्या आत परत न केल्यास प्रती आठवडा रु.१/- याप्रमाणे विलंब शुल्क आकारला जाईल. मागणी व ग्रंथाच्या उपलब्धतेनुसार ओळखपत्रावर देण्यात आलेल्या पुस्तकांचे शक्य असल्यास नुतनीकरण करण्यात येईल. परंतु कांही विशिष्ट ग्रंथ (जादा मागणी असलेले) मुद्दाम जाणीवपूर्वक दिलेल्या मुदतीत परत न केल्यास प्रतीदिन रु. ५/- याप्रमाणे दंड आकारला जाईल.

## विशेष पुस्तक पेढी

१) अकरावी व बारावी कला व वाणिज्य वर्गाच्या विद्यार्थ्यांना रु. ५००/- ग्रंथालय शुल्क आकारुन वर्षभरासाठी सर्व विषयाची क्रमिक पुस्तके व अन्य आवश्यक ग्रंथालय सेवा उपलब्ध करून देण्यात येईल.

२) पुस्तक पेढीतील पुस्तके घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

३) विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षा संपलेल्या तारखेपासून दहा दिवसाच्या आत पुस्तक-पेढीतील वर्षभरासाठी दिलेली

क्रमिक पुस्तके तसेच ओळखपत्रावर सात दिवसासाठी देण्यात आलेले ग्रंथ, वाचनकक्षातुन घेतलेले वाचनसाहित्यासह ओळखपत्र परत करने बंधनकारक आहे. परीक्षा संपलेल्या तारखेपासून दहा दिवसाच्या आत क्रमिक पुस्तके ग्रंथालयात परत करावीत अन्यथा प्रत्येक पुस्तकास रु.१०/- या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

### वाचनकक्ष

१) विद्यार्थी - विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय.

२) वाचनालय सकाळी ८.३० ते सायं ४.०० पर्यंत उघडे राहील.

३) वाचनकक्षात ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही.

४) वाचनकक्षात पाठ्यपुस्तकाशिवाय स्पर्धात्मक परीक्षेची पुस्तके, दैनिके, नियतकालिके व प्रश्नपत्रिका संच इ.वाचनसाहित्य ओळखपत्रावर मिळेल.

५) अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशपूर्व परीक्षेसाठी उपयुक्त असलेली सर्व उपलब्ध ग्रंथ व नियतकालिके ओळखपत्रावर देण्यात येतील.

६) संशोधन उपयोगी नियतकालिकाच्या मागील अंकांचे खंड मागणी नुसार संदर्भासाठी ओळखपत्रावर देण्यात येतील.

७) वाचनकक्षात विद्यार्थ्यांनी शांतता पाळावी. इतरांना त्रास होईल असे वर्तन करु नये. बेशिस्तपणा व ग्रंथालय नियमांचे उल्लघंन करु नये.

८) विद्यार्थ्यांनी वाचनकक्षात येताना पैसे, मौल्यवान वस्तु सोबत आणू नयेत. त्या गहाळ झाल्यास महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहणार नाही.

### रात्रीची अभ्यासिका

१) शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासुनच याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी रात्रीची अभ्यासिका रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवसासह सायंकाळी ४.०० ते रात्री ११.०० या वेळेपर्यंत चालू राहील.

२) रात्रीच्या अभ्यासिकेत फक्त अभ्यासक्रमास अनुसरुन ग्रंथ व इतर पूरक वाचन साहित्य विद्यार्थ्यांना ओळखपत्रावर देण्यात येतील.

३) अभ्यासिकेशिवाय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन परीसरात इतरत्र कोठेही बसू दिले जाणार नाही.

### सायकल स्टँड

१) वाहनधारक विद्यार्थ्यांनी आपले वाहन सायकल स्टँडवरच ठेवणे बंधनकारक आहे.

२) वाहनांची नोंद सायकल स्टँड चालकाच्या नोंदवहीत करावी.

३) सायकल अथवा वाहन कुलुप लावल्याशिवाय ठेवू नये.

४) अल्पकाळासाठी सायकल व मोपेड आणल्यास प्रत्येक दिवसाला अनुक्रमे तीन व पाच रुपये शुल्क द्यावे लागेल.

५) एक महिन्यापेक्षा जास्त दिवस सायकल स्टँडवर वाहन ठेवायचे असेल तर शुल्क पुढील प्रमाणे राहील - **सायकल दरमहा रु.२०/- व मोटार सायकल दरमहा. रु.४०/- वार्षीक फीः सायकल रु.२००/- व मोटार सायकल रु.४००/-**

६) वर्षभरासाठी सायकल स्टँडचा वापर करण्यासाठी सुरूवातीलाच वर्षभराचे शुल्क भरावे लागेल.

७) आपले वाहन दुसयास वापरता येणार नाही. तसे केल्यास रु. २०/- दंड आकारण्यात येईल.

८) वाहनास चावी विसरल्यास सायकलीस रु. २०/- व स्कूटर मोटार सायकल यास रु. ५०/- दंड आकारण्यात येईल.

## ११वी व १२वी कला व वाणिज्य फी (अनुदानित)

| अ.क्र. | विवरण | ११वी | १२वी |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश फी | १६ | १८ |
| २ | टर्म फी | ३२ | ३६ |
| ३ | ट्युशन फी | १९२ | २१६ |
| ४ | ओळखपत्र फी | ५० | ५० |
| ५ | इंटरनेट व सॉफ्टवेअर फी | १०० | १०० |
| | **एकूण** | **३९०** | **४२०** |
| **शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर (अतिरिक्त सेवा शुल्क)** | | | |
| १ | ग्रंथालय शुल्क | ५०० | ५०० |
| २ | अंतर्गत परीक्षा फी | २५० | ५०० |
| ३ | पत्रव्यवहार | ७५ | ५० |
| ४ | कॉरपस फंड | १०० | १०० |
| ५ | ऑनलाईन प्रोसेसिंग फी | १०० | १०० |
| | **एकूण** | **१०२५** | **१२५०** |
| | **एकूण (अनुदानित व अतिरिक्त)** | **१४१५** | **१६७०** |

## ११वी व १२वी कला फी (अनुदानित)

| अ.क्र. | विना अनुदानित ऐच्छिक विषय | ११वी | १२वी |
|---|---|---|---|
| १ | माहिती तंत्रज्ञान (कला) | १२०० | १२०० |

**विशेष सूचना : स्वयं अर्थसाह्यीत (विना अनुदानित) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर पर्यंत प्रवेश रद्द केला असेल तर एकूण शिक्षण शुल्कच्या २० टक्के रक्कम व इतर शुल्क भरणे आवश्यक आहे. या तारखेनंतर प्रवेश रद्द करणाया विद्यार्थ्यांना पूर्ण वर्षाचे शिक्षण व इतर शुल्क भरावे लागेल.**

## ११वी व १२वी वाणिज्य फी (विना अनुदानित)

| अ.क्र. | विवरण | ११वी | १२वी |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश फी | १६ | १८ |
| २ | टर्म फी | ३२ | ३६ |
| ३ | ट्युशन फी | १५००० | १५००० |
| ४ | ओळखपत्र फी | ५० | ५० |
| ५ | इंटरनेट व सॉफ्टवेअर फी | १०० | १०० |
| | **एकूण** | **१५,१९८** | **१५,२०४** |
| **शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर (अतिरिक्त सेवा शुल्क)** | | | |
| १ | ग्रंथालय शुल्क | ५०० | ५०० |
| २ | अंतर्गत परीक्षा फी | २५० | ५०० |
| ३ | पत्रव्यवहार | ७५ | ५० |
| ४ | कॉरपस फंड | १०० | १०० |
| ५ | ऑनलाईन प्रोसेसिंग फी | १०० | १०० |
| | **एकूण** | **१०२५** | **१२५०** |
| | **एकूण** (विना अनुदानित व अतिरिक्त) | **१६,२२३** | **१६,४५४** |

विशेष सूचना : स्वयं अर्थसाह्यीत (विना अनुदानित) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर पर्यंत प्रवेश रद्द केला असेल तर एकूण शिक्षण शुल्कच्या २० टक्के रक्कम व इतर शुल्क भरणे आवश्यक आहे. या तारखेनंतर प्रवेश रद्द करणाया विद्यार्थ्यांना पूर्ण वर्षाचे शिक्षण व इतर शुल्क भरावे लागेल.

## ११वी व १२वी वाणिज्य फी (सीए-फाऊंडेशन बॅच)

| अ.क्र. | विवरण | ११वी | १२वी |
|---|---|---|---|
| १ | पीपीई फी | २५००० | २५००० |
| २ | प्रवेश फी | १६ | १८ |
| ३ | टर्म फी | ३२ | ३६ |
| ४ | ट्युशन फी | १९२ | २१६ |
| ५ | ओळखपत्र फी | ५० | ५० |
| ६ | इंटरनेट व सॉफ्टवेअर फी | १०० | १०० |
| | **एकूण** | **२५,३९०** | **२५,४२०** |
| **शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर (अतिरिक्त सेवा शुल्क)** | | | |
| १ | ग्रंथालय शुल्क | ५०० | ५०० |
| २ | अंतर्गत परीक्षा फी | २५० | ५०० |
| ३ | पत्रव्यवहार | ७५ | ५० |
| ४ | कॉरपस फंड | १०० | १०० |
| ५ | ऑनलाईन प्रोसेसिंग फी | १०० | १०० |
| | **एकूण** | **१०२५** | **१२५०** |
| | **एकूण (सीए फा. व अतिरिक्त)** | **२६,४१५** | **२६,६७०** |

**विशेष सूचना : स्वयं अर्थसाह्यीत (विना अनुदानित) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर पर्यंत प्रवेश रद्द केला असेल तर एकूण शिक्षण शुल्कच्या २० टक्के रक्कम व इतर शुल्क भरणे आवश्यक आहे. या तारखेनंतर प्रवेश रद्द करणाया विद्यार्थ्यांना पूर्ण वर्षाचे शिक्षण व इतर शुल्क भरावे लागेल.**

## ११वी व १२वी कला फी (इंग्रजी माध्यम)

| अ.क्र. | विवरण | ११वी | १२वी |
|---|---|---|---|
| १ | आय.टी. विषय | १२०० | १२०० |
| २ | इंग्रजी माध्यम फी | १२,००० | १२,००० |
| ३ | प्रवेश फी | १६ | १८ |
| ४ | टर्म फी | ३२ | ३६ |
| ५ | ट्युशन फी | १९२ | २१६ |
| ६ | ओळखपत्र फी | ५० | ५० |
| ७ | इंटरनेट व सॉफ्टवेअर फी | १०० | १०० |
| | **एकूण** | **१३,५९०** | **१३,६२०** |
| **शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर (अतिरिक्त सेवा शुल्क)** | | | |
| १ | ग्रंथालय शुल्क | ५०० | ५०० |
| २ | अंतर्गत परीक्षा फी | २५० | ५०० |
| ३ | पत्रव्यवहार | ७५ | ५० |
| ४ | कॉरपस फंड | १०० | १०० |
| ५ | ऑनलाईन प्रोसेसिंग फी | १०० | १०० |
| | **एकूण** | **१०२५** | **१२५०** |
| | **एकूण** (इंग्रजी माध्यम व अतिरिक्त) | **१४,६१५** | **१४,८७०** |

**विशेष सूचना : स्वयं अर्थसाह्यीत (विना अनुदानित) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर पर्यंत प्रवेश रद्द केला असेल तर एकूण शिक्षण शुल्कच्या २० टक्के रक्कम व इतर शुल्क भरणे आवश्यक आहे. या तारखेनंतर प्रवेश रद्द करणाया विद्यार्थ्यांना पूर्ण वर्षाचे शिक्षण व इतर शुल्क भरावे लागेल.**

# कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची यादी

| | |
|---|---|
| ०१) डॉ. महादेव गव्हाणे | प्राचार्य |
| ०२) डॉ. ए.जे. राजू | उपप्राचार्य |
| ०३) श्रीमती प्रा. सुचेता वाघमारे | उपप्राचार्या |
| ०४) प्रा. संजय बिराजदार | पर्यवेक्षक |

## कला शाखा

| | |
|---|---|
| ०१) प्रा. एन. जे. काळे | भूगोल |
| ०२) प्रा. एम. एस. जाधव | संस्कृत |
| ०३) डॉ. व्ही. के. करजकर | मराठी |
| ०४) प्रा. आर. एस. सावरे | रशियन |
| ०५) प्रा. एस. डी. शिंदे | संस्कृत |
| ०६) प्रा. एच. जी. जोशी | संगीत |
| ०७) डॉ. बी. बी. पाटील | राज्यशास्त्र/पाली |
| ०८) डॉ. एस. बी. जाधव | अर्थशास्त्र |
| ०९) श्रीमती प्रा.एस.जी. तोडकर | हिंदी |
| १०) प्रा. व्ही. ए. गवळी | हिंदी |
| ११) श्रीमती प्रा.आर.बी. कोळी | क्रीडा |
| १२) प्रा. एस. एन. मोरे | इंग्रजी |
| १३) प्रा. एस. एस. पाटील | राज्यशास्त्र |
| १४) प्रा. वाय. बी. शिखरे | अर्थशास्त्र |
| १५) प्रा. एन. बी. चव्हाण | समाजशास्त्र |
| १६) प्रा. व्ही.बी. संपत्ते | अर्थशास्त्र |
| १७) प्रा. पी.एच. जाधव | संगीत |

## वाणिज्य शाखा

| | |
|---|---|
| १८) प्रा. ए. व्ही. आराध्ये | वाणिज्य |
| १९) प्रा. एफ. ए. शेख | वाणिज्य |

## एच.एस.सी. व्होकेशनल शाखा

| | |
|---|---|
| २०) प्रा. एस. एन. शिंदे | इलेक्ट्रॉनिक्स |
| २१) प्रा. आर. व्ही. पाटील | मत्स्यशास्त्र |
| २२) प्रा. के. एम्. खंदाडे | इलेक्ट्रॉनिक्स |
| २३) प्रा. व्ही. ए. झरीटाकळीकर | पीकशास्त्र |
| २४) प्रा. ए. आर. गालफाडे | मत्स्यशास्त्र |

## राजर्षी शाहू महाविद्यालय - शालेय व्यवस्थापन समिती

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | डॉ. गोपाळराव पाटील | अध्यक्ष |
| २. | प्राचार्य अनिरुद्ध जाधव | सदस्य |
| ३. | श्री. गोपाळ शिंदे | सदस्य |
| ४. | डॉ. आर. एल. कावळे | सदस्य |
| ५. | प्रा. नानासाहेब काळे | सदस्य |
| ६. | श्री. सतिश चव्हाण | सदस्य |
| ७. | उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू | निमंत्रीत सदस्य |
| ८. | उपप्राचार्या श्रीमती सुचेता वाघमारे | निमंत्रीत सदस्य |
| ९. | पर्यवेक्षक प्रा. संजय बिराजदार | निमंत्रीत सदस्य |
| १०. | प्रा. सुदर्शन पाटील | निमंत्रीत सदस्य |
| ११. | प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे | सचिव |

**शैक्षणिक समन्वय समिती :**

१. कार्यालय : (०२३८२) २४५९३३
२. उपप्राचार्या : प्रा. श्रीमती सुचेता वाघमारे : ९४२३७१९५३४
३. पर्यवेक्षक : प्रा. संजय बिराजदार : ९४२२६१२१६१
४. विभाग प्रमुख : प्रा. शिवाजीराव शिंदे (एच.एस.सी. व्होकेशनल) ९९७५४३९२४६
५. समन्वयक : प्रा. सुदर्शन पाटील (कला) : ९७३०६८२३१६
६. समन्वयक : डॉ. सुधीर जाधव (सीए-फाऊंडेशन) : ९९७००३७५२०
७. समन्वयक : प्रा. अवधूत आराध्ये (वाणिज्य) : ९०९६५००१०५

## राजर्षी शाहू महाविद्यालय - कार्यालयीन संपर्क

१. श्री. महेश शिंदे : ८६६९४९२३०५ २. श्री. संगमेश्वर भंगे : ९७६७३५१८८७
३. श्री. प्रशांत टेंकाळे : ९७३०१४५६३२

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## १२ वी बोर्ड परीक्षा २०२१ वाणिज्य शाखेत ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे गुणवंत विद्यार्थी



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सिद्धीदात्री तापडीया | ऋतुजा पोकरणा | ओम भुतडा | शेख सुमैय्या | सोमेश भारती | अमृता शिंदे | श्रुती जिरोबे | वैष्णवी वाटेगांवकर |
| ९८.६७ | ९७.३३ | ९६.५० | ९६.१७ | ९५.५० | ९५.३३ | ९५.३३ | ९५.१७ |



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| साईश्री भोसले | समिक्षा तापडिया | श्रीतेज लाकाळ | दिक्षा जानते | अथर्व पोरवाल | वैदेही कुलकर्णी | प्रांजल जोशी | दर्शन दर्डा |
| ९५.१७ | ९५.०० | ९५.०० | ९४.६७ | ९४.५० | ९४.५० | ९४.३३ | ९४.३३ |



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सानिका कुलकर्णी | तेजस्विनी बनसुडे | मयुर बोळेगावे | विशाल लोहारे | वैष्णवी पेंढरकर | हर्षराजसिंग ठाकुर | आदित्य शेळके | मिताली खंडेलवाल |
| ९४.१७ | ९४.०० | ९४.०० | ९४.०० | ९३.८३ | ९३.८३ | ९३.६७ | ९३.६७ |



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| केशवराज तट | सोहम शेठ | वैष्णवी नाडे | पायल भुतडा | ज्ञानेश्वर खिल्लारे | भाग्यश्री फड | नागेश गडेवार | आदित्य अग्रवाल |
| ९३.६७ | ९३.५० | ९३.१७ | ९२.५० | ९२.५० | ९२.३३ | ९२.१७ | ९१.८३ |



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नक्षत्रा जोशी | स्वाती रणखांब | मिताली तापडिया | साक्षी कुलकर्णी | श्रेया डिगे | तेजस मुंदडा | अभिजित भुरे | विधी तिवारी |
| ९१.८३ | ९१.८३ | ९१.६७ | ९१.५० | ९१.५० | ९१.३३ | ९१.३३ | ९१.१७ |



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ईशिका जाधव | प्रणव बिडवे | जान्हवी इंगळे | श्रद्धा मोरलावार | रमण पुरोहित | आकांक्षा विभुते | प्रसाद फलटणकर | मुंगळे शबानाबानू |
| ९१.०० | ९१.०० | ९०.८३ | ९०.८३ | ९०.६७ | ९०.५० | ९०.५० | ९०.३३ |



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्नेहा मुंदडा | पुजा टाकेकर | आंचल अग्रवाल | श्रद्धा सोमवंशी | राधिका कासले | मोहिनी मोरे | ऋचा शिंदे | शरयु कल्याणी | विजय जाधव |
| ९०.३३ | ९०.३३ | ९०.१७ | ९०.०० | ९०.०० | ९०.०० | ९०.०० | ९०.३३ | ९०.३३ |

## कला शाखा इंग्रजी माध्यमातील गुणवंत विद्यार्थी



भाग्यश्री वाघचौरे
९५.३३



प्रतिक्षा केदार
९४.६७



तांबोळी सादीया
९३.८३



वैष्णवी पांचाळ
९३.५०

## एच.एस.सी. व्होकेशनल शाखेतील गुणवंत विद्यार्थी



मोरे प्रसाद
८३.००
इले. टेक्नॉ.



काळे अंकीता
८१.००
फिश. टेक्नॉ.



जाधव रत्नदीप
८०.५०
पिक शास्त्र

हार्दिक अभिनंदन

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर




## निकालाची ठळक वैशिष्ट्ये

- वाणिज्य शाखा बोर्ड परीक्षा निकाल १००%
- वाणिज्य शाखेत ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी ५७ विद्यार्थी
- वाणिज्य शाखेत ८५% पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी १३८ विद्यार्थी
- विषयनिहाय पैकीच्या पैकी गुण घेणारे विद्यार्थी :
  - १. पाली - १२ (वाणिज्य)
  - २. गणित - ०९ (वाणिज्य)
  - ३. पुस्तपालन व लेखाकर्म - ०८ (वाणिज्य)
  - ४. अर्थशास्त्र - ०१ (वाणिज्य)
  - ५. पाली - ०१ (कला)
- कला शाखा बोर्ड परीक्षा निकाल ९८.१४%
- कला शाखेत ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी १७ विद्यार्थी
- कला शाखेत ८५% पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी ३१ विद्यार्थी
- कला शाखेत इंग्रजी माध्यमात ८०% पेक्षा जास्त गुण घेणारे १६ विद्यार्थी
- एच.एस.सी. व्होकेशनल शाखेत ७५% पेक्षा जास्त गुण घेणारे ०६ विद्यार्थी